# SAPTASHRUNGI BAHUUDDESHIYA MAHILA SANSTHA DHULE

Reg. No. MH 7637/F 3764/2006 Dhule

12AA No.-(PRO)/12AA/2012 2013/18/47
80GNo.-(CIT-I) 80G/2012-2013/4229/67/83

NGO DARPAN Unique ID-MH/2012/0052945

**Email: minabhosale@gmail.com**

**Head-Office: -** **51, Saptshrungi Nagar, B/H Akashwani Kendra, Near Om Nagar, Walwadi Shiwar, Vidya Nagari Deopur-Dhule-05.**

**PH No.02562-275067.** **Mob: 8857041049 / 9657825963**


**O/W.No. /SBMS /2023** **Date: / /2023**

# ANNUAL REPORT 2022-23

## 01, April 2022 to 31 March 2023

सप्तश्रृंगी बहुउद्देशीय महिला संस्था धुळे २००६ पासून विविध प्रकल्पांद्वारे सामाजिक कार्य करत आहे. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई सहाय्यित लिंक वर्कर प्रकल्पाच्या माध्यमातून धुळे जिल्ह्यातील १०० गावांमधील अति जोखीम गटातील लोकांची HIV तपासणी करून HIV बाधित रुग्णाला ART ची सेवा व शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून देणे. तसेच लक्ष्यगट हस्तक्षेप प्रकल्पाच्या माध्यमातून शहरी भागातील FSW व MSM या समुदायातील लोकांची HIV बाधित रुग्णाला ART ची सेवा व शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून देणे. महिला व बालविकास मंत्रालय नवी दिल्ली सहाय्यित चाइल्डलाईन १०९८ हेल्पलाईन सेवा दिवसाचे २४ तास वर्षातील ३६५ दिवस काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी विनामूल्य सेवा आहे हि ० ते १८ वयोगटातील बालकांसाठी कार्यरत आहे. तसेच आदर्शगाव योजना - पाणलोट विकास, शेतकरी, पर्यावरण, आरोग्य व रोजगार विषयक विविध योजनांच्या माध्यमातून गरजूंना मदत करते.

# लिंक वर्कर प्रकल्प

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई सहाय्यित सप्तशृंगी बहुउद्देशिय महिला संस्था धुळे, मार्फत १ जानेवारी २०१४ पासून लिंक वर्कर प्रकल्प कार्यरत आहे. लिंक वर्कर प्रकल्पांतर्गत धुळे जिल्ह्यातील 100 गावांमध्ये एचआयव्ही जनजागृतीचे काम केले जाते. त्यामध्ये अति जोखीम गटातील लोकांमध्ये HIV चे प्रमाणाला प्रतिबंध व्हावा म्हणून लिंक वर्करच्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये ICTC चे समुपदेशक व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांच्या मार्फत तपासणी करण्यात येते. गावामधील अति जोखीम गटातील FSW, MSM, TRUCKER, MIGRANT, Other VP, TB Petient, ANC Mother अशा लोकांची तपासणी करण्यात येते. गावात झालेल्या HIV तपासणी कॅम्प अंतर्गत जर कोणी HIV पॉजिटीव्ह निघाले तर त्या व्यक्तीला लिंक वर्कर च्या माध्यमातून जिल्ह्यातील ART केंद्राला लिंक करण्यात येते. त्याच पद्धतीने अशा HIV पॉजिटीव्ह व्यक्तीला लिंक वर्करच्या माध्यमातून सामाजिक उत्तरदायित्व म्हणून त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देखील देण्यात आला. जसे - घरकुल आवास योजना, संजय गांधी निराधार योजना, आधार कार्ड, ई-श्रम कार्ड, AABHA कार्ड, बस पास अशा विविध योजनाचा लाभ देण्यात आला. या प्रकल्पामुळे प्रकल्पातील गावांमधील एचआयव्हीचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे लोकांमध्ये आढळून आले. तसेच ग्रामीण भागातील अति जोखीम गटातील लोकांना आरोग्य शिबिरामध्ये डॉक्टरकडून मोफत आरोग्य तपासणी करून मोफत गोळ्या औषधी दिल्या जातत.

# Dhule District

## Statistics

| | | HIV Positive Cases typology wise | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Village | No. of HIV Positive Cases (new Idetification in year) | FSW | MSM | MIGRANT | TRUCKER | Other VP | ANC | TB Cases |
| 100 | 15 | 181 | 12 | 10079 | 541 | 7789 | 705 | 19 |

| ALIVE Cases Cumulative | TB | |
|---|---|---|
| PLHIV | TB Cases | TB Treatment Completed |
| 237 | 19 | 19 |

## Social Benefit

| Sr.No. | Benifits | Total |
|---|---|---|
| 1 | E-Shram Card | 01 |
| 2 | Aadhar Card | 02 |
| 3 | Bus Pass | 02 |
| 4 | ART Certificate | 03 |
| 5 | Sanjay Gandhi Niradhar Yojana | 01 |
| | **Total** | **09** |

## Health Camp

| Total Health Camp | Benificary | Positive |
|---|---|---|
| 16 | 846 | 0 |

## लिंक वर्कर प्रकल्पांतर्गत  गावामध्ये १६ आरोग्य शिबीर घेऊन एकूण ८४६ लोकांची आरोग्य तपासणी करून त्यांना औषधोपचार करण्यात आला.




धुळे तालुक्यातील वणी या गावाला आरोग्य शिबीर घेण्यात आले त्यामध्ये ४८ लोकांची आरोग्य तपासणी करून औषधी वाटप करण्यात आले.



साक्री तालुक्यातील शेवडीपाडा या गावाला आरोग्य शिबीर घेण्यात आले त्यामध्ये ६१ लोकांची आरोग्य तपासणी करून औषधी वाटप करण्यात आले.

१ डिसेंबर जागतिक  एड्स दिवस निमित्त धुळे सिविल हॉस्पिटल येथे मा.जिल्हाधिकारी मा.श्री.जलज शर्मा, धुळे सिविल येथील जिल्हा शल्य चिकित्सक मा.कांचन वानेरे, डापकू येथील  जिल्हा कार्यक्रम अधिकारी मा.श्रीमती शीतल पाटील, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव मा.श्री. संदीप स्वामी उपस्थित कार्यक्रम संपन्न.



१ डिसेंबर जागतिक एड्स दिवस निमित्त धुळे सिविल हॉस्पिटल येथे मा.जिल्हाधिकारी मा.श्री.जलज शर्मा यांनी जागतिक एड्स दिवस निमित्त मार्गदर्शन केले.




१ डिसेंबर जागतिक एड्स दिवस निमित्त धुळे सिविल हॉस्पिटल येथे मा.जिल्हाधिकारी यांनी रॅलीला हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात केली.

# श्री गुरुदत्त हायस्कूल , वायपूर याठिकाणी जागतिक युवा दिनानिमित्त HIV संबंधित माहिती व जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.




श्री गुरुदत्त हायस्कूल , वायपूर याठिकाणी जागतिक युवा दिनानिमित्त शाळेचे मुख्याध्यापक मुलांना HIV व आरोग्याविषयी संबंधित माहिती देताना.




जागतिक युवा दिनानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची रॅलीमध्ये सहभागी लिंक वर्कर छाया भदाणे, ललिता अहिरे, निलेश बैसाणे.

ठिकाण:- उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय,
दहिवेल ता.साक्री जि.धुळे

दि.01/12/2022

## सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेमार्फत उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, दहिवेल ता.साक्री जी.धुळे येथे जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम.



**जागतिक एड्स दिनानिमित्त उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. सुरेश चिंतामण अहिरे मार्गदर्शन करतांना.**




**उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी पिंपळनेर ICTC चे समुपदेशक श्री. हेमंत जाधव व लिंक वर्कर सुनिता चौरे काशिनाथ चौरे.**

ठिकाण:- कै.एम.डी.सिसोदे कला व विज्ञान महाविद्यालय, नरडाणा ता.शिंदखेडा जि.धुळे

दि.02/12/2022

**सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेमार्फत कै.एम.डी.सिसोदे कला व विज्ञान महविद्यालय,नरडाणा येथे जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम.**



महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना HIV संबंधी मार्गदर्शन करतांना लिंक वर्कर छाया भदाणे, ललिता अहिरे.




महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना HIV संबंधी शपथ घेतांना लिंक वर्कर छाया भदाणे, ललिता अहिरे व निलेश बैसाणे.

ठिकाण:- छगनमल साहेबराम बाफना हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, फागणे ता.धुळे जि.धुळे    दि.12 /12/2022

**सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेमार्फत छगनमल साहेबराम बाफना हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय फागणे येथे जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम.**



मनपा ICTC चे लॅब टेक्निशियन श्री. प्रवीण पालोदकर, सुपरवायझर झेलर पावरा, लिंक वर्कर तेजश्री जगदाळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसमवेत एड्स विषयी प्रतिज्ञा घेतांना .




फागणे गावातील एकलव्य नगरमध्ये आरोग्य शिबीर व HIV तपासणी कॅम्पमध्ये एकूण ३९ नागरिकांनी मोफत आरोग्य तपासणी करून गोळ्या औषधींचा लाभ घेतला.

# लक्षगट हस्तक्षेप प्रकल्प

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी मुंबईने सहाय्यित सप्तश्रुंगी बहुउद्देशीय महिला संस्थेला ०१ एप्रिल २०१७ पासून आजपर्यंत लक्ष्यगट हस्तक्षेप (T.I.C.C.) प्रकल्प राबवित आहे. त्यात प्रामुख्याने धुळे जिल्ह्यातील शहरी भागातील देहविक्री करणाऱ्या महिला व MSM त्यांचे जोडीदार, PLHIV व त्यांचे जोडीदार, मुले,यांच्या ICTC अंतर्गत HIV तपासणी करणे तसेच संस्थेमार्फत विविध कॅम्प आयोजीत करून HRG ची आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार केला जातो. त्या कॅम्प मध्ये निघालेल्या पॉझ़िटीव पेशंटला ART ला लिंक करणे, तसेच क्लिनिकल सेवा पुरविणे, गुप्तरोग निदान व उपचार सुद्धा केले जातात.

तसेच संस्थेमार्फत CBS (Community Base Screening) HIV तपासणी करून त्यात पॉझ़िटीव पेशंट निघाला तर त्याला ICTC ला रेफर करून त्याला ART ला लिंक केले जाते. व औषधोपचार सुरु केला जातो.

संस्थेमार्फत HRG यांना Social Benefit Scheme चा लाभ मिळवून दिला जातो. त्यात रेशन कार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड,आभा कार्ड, ई श्रम कार्ड, बँक अकाऊंट, बस पास, Pan कार्ड, संजय गांधी निराधार योजना, बालसंगोपन योजना, घरकुल योजना, उत्पन्न दाखला इ.

संस्था कर्मचार्यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करते, कायदेविषयक कार्यशाळा HRG साठी आयोजित करते.विविध असे सामाजिक उपक्रम राबविले जातात.

# ICTC Testing

| | FSW | MSM | FSW Partener | MSM Partener | Total |
|---|---|---|---|---|---|
| **ICTC Testing** | 420 | 516 | 10 | 08 | **954** |
| **Positive** | 3 | 1 | 2 | 0 | **6** |

# CBS Testing

| | FSW | MSM | Positive |
|---|---|---|---|
| **CBS Testing** | 1198 | 584 | 0 |
| **Total** | 1198 | 584 | 0 |

# STI ( Check up)

| Checkup **Center** | FSW | MSM | Total |
|---|---|---|---|
| STI Checkup | 3363 | 1954 | 5317 |
| **Treated** | 4 | 3 | 7 |

# Social Benefit

| Sr.No. | Benifits | Total |
|---|---|---|
| **1** | Ration Card | 02 |
| **2** | Income Certificate | 01 |
| **3** | E-Shram Card | 08 |
| **4** | Pan Card | 02 |
| **5** | Aadhar Update | 02 |
| **6** | Bus Pass | 01 |
| **7** | Balsangopan Yojana | 01 |
| **8** | Bank Account | 01 |
| | **Total** | **18** |

# सन 2022- 2023 आरोग्य शिबीर

| Total Health Camp | Benificary | Positive |
|---|---|---|
| **6** | 330 | 1 |

# सप्तशृंगी बहूद्देशीय महिला संस्था व विधी सेवा प्राधिकरण मार्फत कायदेविषयक मार्गदर्शन व आरोग्य शिबीर संपन्न




अति जोखीम गटातील महिलांना विधी सेवा प्राधिकरण चे सचिव मा.श्री संदीप स्वामी सर  कायदेविषयक मार्गदर्शन करतांना.




अति जोखीम गटातील महिलांना डापकू येथील जिल्हा कार्यक्रम अधिकारी मा.श्रीमती शीतल पाटील HIV एड्स संदर्भात मार्गदर्शन करतांना.

# सप्तशृंगी बहूद्देशीय महिला संस्थेमार्फत जागतिक एड्स दिनानिमित्त धुळे येथे आरोग्य शिबीर संपन्न




जागतिक एड्स दिनानिमित्त धुळे येथे HIV AIDS विषयी शपथ घेतांना.

# वडजाई रोड धुळे आरोग्य शिबीर व HIV तपासणी कॅम्प





**धुळे जिल्ह्यातील अति जोखमीच्या गटातील लोकांची मोफत हिपॅटायटीस बी व सी तपासणी शिबिराचे आयोजन शिंदखेडा परिसरात सप्तशृंगी बहूउद्देशिय महिला संस्थेमार्फत करण्यात येऊन एकूण ८०० लोकांची तपासणी करण्यात आली.**






## सोनगीर याठिकाणी कला पथकाद्वारे HIV एड्स संदर्भात जनजागृती करून HIV तपासणी करण्यात आली.




## कला पथकाचे कलाकार HIV एड्स संदर्भात जनजागृती करतांना.



लक्षगट हस्तक्षेप प्रकल्पाअंतर्गत संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले यांच्या अध्यक्षतेखाली हळदी कुंकूवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यात लक्षगट हस्तक्षेप प्रकल्पातील कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.






# चाईल्डलाईन प्रकल्प 1098

महिला व बाल विकास मंत्रालय नवी दिल्ली सहाय्यीत चाईल्ड लाईन इंडिया फांऊडेशन संचालित सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था धुळे अंतर्गत २०१९ पासून चाईल्ड लाईन 1098 हा प्रकल्प धुळे जिल्ह्यातील 0 ते 18 वयोगटातील बालकांसाठी कार्यरत आहे. चाइल्डलाइन 1098 हा एक फोन नंबर आहे जो भारतातील लाखो मुलांसाठी आशा जागवतो. चाईल्ड लाईन 1098 सर्वच बालकांना प्रतिसाद देते परंतु काळजी व संरक्षणाची गरज असणाऱ्या, असुरक्षित क्षेत्रात राहणाऱ्या बालकांवर अधिक लक्ष केंद्रात करते. हे दिवसाचे 24 तास, वर्षातील 365 दिवस, मदत आणि मदतीची गरज असलेल्या मुलांसाठी विनामूल्य, आपत्कालीन फोन सेवा आहे. आम्ही केवळ मुलांच्या आपत्कालीन गरजांना प्रतिसाद देत नाही तर त्यांना त्यांच्या दीर्घकालीन काळजी आणि पुनर्वसनासाठी संबंधित सेवांशी जोडतो.

**चाईल्ड लाईन 1098 बालकांच्या या समस्यांना प्रतिसाद देते.**

**व्यसनमुक्ती**

घरात मोठी व्यक्ती व्यसनाधीन असेल तर मुले त्यांचे अनुकरण करतात. तसेच आपल्या वयापेक्षा मोठ्या किंवा बरोबरीच्या व्यसनाधीन मुलांच्या संगतीने ती व्यसनाधित होतात. यातील अनेक बालकांना पेट्रोलचा वास घेणे, दारु पिणे, गुटखा खाणे अशा सवयी असणाऱ्यांबाबत चाईल्ड लाईनकडे मदतीसाठी दूरध्वनी आले. अशा अनेक मुलांना चाईल्ड लाईनने समुपदेशन व मानसोपचारतज्ज्ञाचे मार्गदर्शन याद्वारे पुनर्वसन केले.

**बाल भिक्षेकरी**

चाईल्ड लाईनन आजपर्यंत बऱ्याच बाल भिक्षेकरी मुलांचे पुनर्वसन केले आहे. कधी घरची परिस्थिती बिकट असल्याने आई-वडील मुलांना भीक मागायला पाठवितात. मुलांना पैशाचे आकर्षण असते म्हणून भीक मागितली जाते. अशा स्थितीत चाईल्ड लाईन प्रथम धाडी टाकते व यात सापडलेल्या मुलांना व त्यांच्या पालकांना समज दिली जाते.

**बाल विवाह**

चाईल्ड लाईनकडे वर्षभरात ४२बालविवाहाची प्रकरणे आली बालविवाह करणाऱ्यांमध्ये .आदिवासी समाजाचे प्रमाण जास्त असते असे दिसून आले चाईल्ड लाईनने धाडी टाकून .३९ मुलींचे बालविवाह थांबविले आहेत यात .साक्री,धुळे, शिरपूर, शिंदखेडा तालुक्यातील बालविवाहांचा समावेश आहे . बालविवाहाच्या कारणांमध्ये घरची परिस्थिती गरीब असणे, प्रेमलागल्यास कुटुंबाच्या प्रकरणांची कुणकुण-प्रतिष्ठेचा विचार, कुटुंबात भावंडाची संख्या जास्त असल्यास जबाबदारीतून मुक्त होण्यासाठी बालविवाह केले जातातबा .लविवाहाचा मुलीवर मानसिक व शारिरीक विपरीत परिणाम होतो.

**लैगिक शोषण**

अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये चाईल्ड लाईन संस्था शोषित मुलींना व त्यांच्या कुटुंबियांना समुपदेशन करते. पुन्हा नव्याने आयुष्यात पुढे जगण्यासाठी प्रोत्साहित करते. शोषितांच्या शारिरीक व मानसिक स्थितीचा विचार करुन चाईल्ड लाईन पुनर्वसनाचे काम करते.

पीडितांना सरकारी योजनांपर्यंत पोहोचविण्याचे व मानसिक आधार देऊन कायदेशीर कारवाईबाबत सहकार्य करते. एकूणच काय तर बालकांचे बालपण जपण्यासाठी चाईल्ड लाईन धडपडत असतेजर . एखाद्या बालकाचे बालपण खुडले जात असेल, उध्वस्त होत असेल तर त्याच्या मदतीसाठी आपणही डायल करा 1098.

**बाल मजूर**

इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या मते, असे कोणतेही काम जे मुलाच्या बालपणावर परिणाम करते, मुलाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवते, त्यांची क्षमता कमी करते आणि जे काम मुलाची शारीरिक आणि मानसिक स्थिती बिघडते, ते सर्व बालमजुरीचे प्रतिनिधित्व करतात. यात अशा कृत्यांचाही समावेश आहे ज्यामुळे मुलांना सामाजिक आणि नैतिकदृष्ट्या दुखापत होते.जेव्हा एखाद्या मुलाला शाळा सोडण्यास भाग

पाडले जाते तेव्हा बालमजुरी देखील होते. मुलांना त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त काम देणे देखील बालमजुरी अंतर्गत येते. गरिबीमुळे बालमजुरीचे प्रमाण अधिक आहे.

भारतात, 2016 च्या बालकामगार (प्रतिबंध आणि विनियमन) सुधारणा अधिनियमांतर्गत, वयाची चौदा वर्षे पूर्ण न केलेल्या व्यक्तीला बालकाचा दर्जा दिला जातो.

भारतात बालमजुरीचे प्रमाण सर्वाधिक आहे ही खेदाची बाब आहे. शहरी भागात अल्पवयीन मुलांना नोकर म्हणून ठेवले जाते. मुलांना खूप वाईट पद्धतीने काम करायला लावले जाते, काहीवेळा त्यांना अन्नाशिवाय काम करावे लागते, त्यांना कमी वेतन मिळते आणि त्यांना वाईट वागणूक दिली जाते. यामुळेच लहान मुलांवरील शारीरिक, मानसिक आणि लैंगिक अत्याचाराची प्रकरणे समोर येतात. कामगार मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार, ढाबे, चहाची दुकाने, रेस्टॉरंट इत्यादींमध्ये मुलांना काम करायला लावणे हा गुन्हा मानण्यात आला आहे.

**अत्याचार आणि हिंसा**

शारीरिक शोषण म्हणजे मुलांवरील हिंसाचार होय. बाल शोषण म्हणजे एखाद्या मुलाला जाणूनबुजून शारीरिक इजा पोहोचवण्याचा चुकीचा प्रयत्न, जसे की थप्पड मारणे, एखाद्या वस्तूने मारणे, ठोसा मारणे, लाथ मारणे, थरथरणे, लाथ मारणे, कापणे, जाळणे किंवा जास्त कठोर असणे. जेव्हा मुलाकडे दुर्लक्ष केले जाते तेव्हा शारीरिक शोषण देखील होते, याचा अर्थ काळजीचा अभाव आहे, मूलभूत गरजा जसे की योग्य अन्न आणि संरक्षण प्रदान केले जात नाही. यासोबतच विषप्रयोग करणे किंवा मुलाला बुडवून मारण्याचा चुकीचा प्रयत्न करणे यात गैरवर्तन आणि हिंसा देखील समाविष्ट आहे, ज्यामुळे मूल आजारी पडू शकते किंवा मृत्यूही होऊ शकतो.

**भारतात बाल तस्करी**

युनिसेफच्या मते, तस्करीला बळी पडलेले मूल म्हणजे 18 वर्षांखालील कोणतीही व्यक्ती ज्याची भरती, वाहतूक, हस्तांतरित, आश्रय किंवा शोषणाच्या उद्देशाने, देशाच्या आत किंवा बाहेर, प्राप्त केले जाते. महिला मुलांची तस्करी लग्न, देहविक्री, गुन्हेगारी क्रियाकलाप, दत्तक घेणे आणि अवयवांच्या व्यापारासाठी केली जाते तर पुरुष मुलांची तस्करी प्रामुख्याने मजुरीसाठी केली जाते आणि भिकारी म्हणून त्यांचे शोषण केले जाते. काहीवेळा, तस्करी झालेल्या मुलांना सशस्त्र गटांमध्ये किंवा गुन्हेगारी कृत्यांसाठी देखील भरती केले जाते.

**भारतातील हरवलेली मुले**

दरवर्षी असंख्य मुले बेपत्ता होतात. हरवलेल्या मुलांच्या श्रेणीमध्ये अनेक संभाव्य कारणांचा समावेश होतो जसे की कुटुंबातील सदस्यांकडून मुलांचे अपहरण किंवा अपहरण करणे, कुटूंबातील सदस्य नसलेले, पळून गेलेली मुले किंवा कुटुंब आणि आजूबाजूच्या परिस्थितीमुळे पळून जाण्यास भाग पाडणारी मुले, कठीण परिस्थितीत असलेली मुले. किंवा आक्रमक वातावरण, तस्करी झालेली मुले किंवा हरवलेली मुले. हरवलेली मुले अनेकदा गरिबीत रस्त्यावर येतात.

पळून जाणारे मूल त्यांच्या घरातून किंवा त्यांच्या काळजीवाहकांपासून पळून जाण्याची अनेक कारणे आहेत. हे काम शोधणे, घरी आजारी उपचारांपासून दूर राहणे किंवा चांगल्या जीवनाच्या आश्वासनांसह शहराच्या दिव्यांचे अनुसरण करणे असू शकते. पालकांच्या दुर्लक्षामुळे किंवा अकार्यक्षम कुटुंबांमुळे मुलांइतकीच मुली घरातून पळून जाण्याची शक्यता असते. त्यांच्यापैकी बरेच जण देशाच्या रेल्वे प्लॅटफॉर्मवर उतरतात, जिथे ते जगण्यासाठी भीक मागतात, चोरी करतात किंवा गाड्या झाडणे यासारखी क्षुल्लक कामे करतात. बऱ्याचदा, ते बाल तस्करांना बळी पडतात किंवा इतर प्रकारच्या शोषणाला बळी पडतात.

**भारतातील बालशिक्षण**

गरिबीतून सुटण्यासाठी, उपजीविका मिळवण्यासाठी किंवा अतिरिक्त उत्पन्न मिळविण्यासाठी भारतातील अनेक मुले त्यांचे शिक्षण आणि शालेय शिक्षण सोडून देतात. अनेक मुलं कधीच शाळेत जात नाहीत, आणि जर ते आले तर ते शाळा सोडतात किंवा इतरत्र काम करण्यासाठी लवकर सोडतात. या कारणांमुळे, साक्षरतेचे प्रमाण कमी राहते आणि त्यामुळे अनेक मुले सामाजिक आणि आर्थिक शोषणास बळी पडतात.

**कायद्याच्या विरोधातील मुले**

युनिसेफच्या मते, 'कायद्याच्या विरोधातील मुले' हा शब्द 18 वर्षांखालील कोणत्याही व्यक्तीला सूचित करतो जो गुन्हा करण्यासाठी न्याय व्यवस्थेच्या संपर्कात आला आहे किंवा गुन्हा केल्याचा संशय आहे. कायद्याच्या विरोधात असलेल्या बहुतेक मुलांनी क्षुल्लक गुन्हे केले आहेत जसे की हलगर्जीपणा, ट्रॅन्सी, भीक मागणे किंवा दारू वापरणे. पण असे काही आहेत ज्यांनी खून किंवा लैंगिक अत्याचारासारखे गंभीर गुन्हे केले आहेत. काही मुलांना प्रौढांकडून गुन्ह्यात भाग पाडले जाते, हे माहीत आहे की मुले हलक्या शिक्षेने सुटतील.

भारतात, कायद्याच्या विरोधात असलेली मुले बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा, 2015 द्वारे नियंत्रित केली जातात ज्याने पूर्वीचा बाल न्याय कायदा, 2015 ची जागा घेतली. हा कायदा आरोप असलेल्या किंवा कायद्याशी संघर्षात सापडलेल्या मुलांशी संबंधित आहे आणि काळजीची गरज असलेल्या मुलांना त्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करून, बाबींवर निर्णय घेण्यासाठी आणि त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी बाल-अनुकूल दृष्टिकोन स्वीकारून त्यांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करते. कायद्याच्या विरोधात असलेल्या मुलांना किंवा बालगुन्हेगारांना प्रत्येक शहरातील बाल न्याय मंडळासमोर हजर करावे लागते. ही वैधानिक संस्था बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा, 2015 अंतर्गत स्थापन करण्यात आली आहे. तथापि, अनेक प्रकरणांमध्ये मुलांची पोलिसांकडे तक्रार केली जाते, जे नंतर प्रत्येक प्रकरणासाठी सेट केलेल्या प्रोटोकॉलचे पालन करतात. काही प्रकरणांमध्ये मुलांना कायदेशीर आधार दिला जातो.

अशा प्रकरणा मध्ये चाईल्ड लाईन 1098 मुलांच्या हक्कांचे रक्षण करते.

**भारतातील बेघर मुले**

भारतातील शहरी आणि शहरांमध्ये घर नसलेली मुले ही एक मोठी समस्या आहे. अशी अनेक मुलं रेल्वे स्थानकांवर, मंदिरांजवळ, दर्ग्यांजवळ, बाजारपेठेत, पुलांखाली, बस डेपोजवळ आणि थांब्यांजवळ आणि इतर ठिकाणी आढळतात. या मुलांना स्थिर घर किंवा निवारा नसतो आणि त्यांच्यापैकी काहींना कौटुंबिक संबंध नाहीत. ते अत्याचार आणि अमानुष वागणुकीचे सहज बळी ठरतात आणि आर्थिक जगण्यासाठी अनेकदा किरकोळ चोरी किंवा वेश्याव्यवसायात गुंतलेले असतात.

मुलांना रस्त्यावर राहण्यास प्रवृत्त करणारे अनेक घटक आहेत. ओळखले गेलेले एक मूळ कारण म्हणजे गरिबी. बऱ्याचदा, अशी मुले आहेत जी पळून जातात - अपमानास्पद किंवा धोकादायक वातावरणातून पळून गेलेली किंवा शहरांमध्ये चांगल्या नोकरीसाठी घरातून पळून गेलेली. जवळजवळ 50% रस्त्यावरील मुले रॅग-विक्रेते, फेरीवाले आणि शूशाइन मुले म्हणून स्वयंरोजगार करतात, तर इतर दुकाने आणि आस्थापनांमध्ये काम करतात. त्यांचे कामाचे तास दिवसाचे 10-13 तास असतात. या बालकांना अस्वच्छ राहणीमानामुळे आरोग्यास धोका निर्माण होतो आणि त्यांना निवारा नसल्यामुळे त्यांना सतत उष्णता, थंडी आणि पाऊस या पर्यावरणीय परिस्थितीचा सामना करावा लागतो. सार्वजनिक ठिकाणी राहणाऱ्या अनेक बेघर मुलांनाही पालिका अधिकारी आणि पोलिसांकडून त्रास सहन करावा लागतो.

पीडितांना सरकारी योजनांपर्यंत पोहोचविण्याचे व मानसिक आधार देऊन कायदेशीर कारवाईबाबत सहकार्य करते. एकूणच काय तर बालकांचे बालपण जपण्यासाठी चाईल्ड लाईन धडपडत असतेजर एखाद्या बालकाचे बालपण खुडले जात असेल ., उध्वस्त होत असेल तर त्याच्या मदतीसाठी आपणही डायल करा 1098.

## Childline 1098 Total Cases for 2022-23

| Sr.No | Case Category | Total Case |
|---|---|---|
| **1** | Child Marriage | 42 |
| **2** | Child Labor | 07 |
| **3** | Beggar | 21 |
| **4** | Protection Form Abuse | 16 |
| **5** | Counselling | 06 |
| **6** | Death Related | 01 |
| **7** | Education Help | 13 |
| **8** | Emotional Support & Guidance | 06 |
| **9** | Lost & Found | 02 |
| **10** | Medical Help | 06 |
| **11** | Missing | 06 |
| **12** | Nutrition Kit | 01 |
| **13** | Other Intervention | 201 |
| **14** | Parent Asking Help | 10 |
| **15** | Sexual Abuse | 02 |
| **16** | Shelter | 05 |
| **17** | Sponsorship | 01 |
| | **Total** | **345** |

# Open House Programme

| अ.क्र. | दिनांक | ठिकाण | लाभार्थी बालक | लाभार्थी व्यक्ती | भागधारक |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३०-०४-२०२२ | निमखेडी ता. धुळे | ३४ | ०९ | ०५ |
| २ | ३०-०५-२०२२ | वरखेडी ता.धुळे | ३० | ०७ | ०१ |
| ३ | १०/०६/२०२२ | इंदिरा नगर धुळे | १७ | २७ | ०५ |
| ४ | २२/०७/२०२२ | उडाने ता. धुळे | ६१ | १० | ५ |
| ५ | ३१/०८/२०२२ | गोंदूर ता.धुळे | २१ | ०६ | ०१ |
| ६ | २४/०९/२०२२ | महिंदळे धुळे | २१ | ०६ | ०० |
| ७ | २८/१०/२०२२ | मोराने ता.धुळे | १६ | ०१ | ०१ |
| ८ | ३०/१२/२०२२ | मोगलाई धुळे | ३१ | ०० | ०३ |
| ९ | २८/०१/२०२३ | शिंदखेडा | २५ | ३० | ०३ |
| १० | २३/०२/२०२३ | कुंडाणे ता धुळे | ३५ | ०० | ०४ |
| ११ | ०४/०३/२०२३ | रमाई नगर धुळे | ३१ | ३० | १० |



# शालेय जनजागृती कार्यक्रम

| अ. क्र. | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|
| १ | ०६/०४/२०२२ | मोरदड तांडा ता.जि.धुळे |
| २ | २४/०६/२०२२ | मोघन ता.जि.धुळे |
| ३ | २७/०८/२०२२ | समता विद्यालय चितोड रोड ता.जि.धुळे |
| ४ | १२/०९/२०२२ | कन्या विद्यालय बोरकुंड ता.जि.धुळे |
| ५ | १७/१०/२०२२ | मराठी मुला मुलीची शाळा म्हसदी ता.साक्री जि.धुळे |
| ६ | २९/११/२०२२ | स्वामी टेनुराम माध्यमिक शाळा |
| ७ | ३०/१२/२०२२ | संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय |
| ८ | ३१/०१/२०२३ | श्री एकविरा देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय धुळे |
| ९ | ३१/०२/२०२३ | जिल्हा परिषद पिंपरी ता.जि.धुळे |
| १० | १६/०३/२०२३ | सरस्वती कन्या विद्यालय फागणे ता.जि.धुळे |





# प्रशिक्षण कार्यक्रम

| अ.क्र. | दिनांक | ठिकाण | लाभार्थी |
|---|---|---|---|
| १ | ३०/०४/२०२२ | धुळे चाईल्ड लाईन ऑफिस | ३० |
| २ | १९/०५/२०२२ | खेडे ता.जि.धुळे | ४५ |
| ३ | ११/७/२०२२ | पंचायत समिती धुळे | ३९ |
| ४ | १२/७/२०२२ | पंचायत समिती शिरपूर जि.धुळे | ५२ |
| ५ | १३/७/२०२२ | पंचायत समिती शिंदखेडा जि.धुळे | ५६ |
| ६ | १४/७/२०२२ | पंचायत समिती साक्री जि.धुळे | ४६ |
| ७ | १५/७/२०२२ | जिल्हा विधी प्राधिकरण कार्यालय धुळे | ४२ |
| ८ | ०६/०८/२०२२ | प्राथमिक शाळा चौगाव ता.जि.धुळे | ५० |
| ९ | १७/११/२०२३ | पंचायत समिती साक्री | ५४ |
| १० | १३/१/२०२३ | चाईल्ड लाईन ऑफिस | २० |
| ११ | २५/०३/२०२३ | मराठा सेवा संघ धुळे कार्यालय | ५० |






# आऊट रिच

| अ.क्र. | महिना | आउट रिच | लाभार्थी बालक | लाभार्थी व्यक्ती | भागधारक |
|---|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल | ३० | ९५६ | १६२३ | २८ |
| २ | मे | २६ | ७७६ | १२९६ | २६ |
| ३ | जुन | २९ | ८६५ | १४०१ | ३५ |
| ४ | जुलै | १६ | ४८३३ | ९३२ | १२ |
| ५ | ऑगस्ट | २६ | ७९३ | १३८४ | ४० |
| ६ | सप्टेंबर | २४ | १०१३ | १४१३ | ३२ |
| ७ | ऑक्टूबर | १८ | ६६२ | १०७३ | ३५ |
| ८ | नोव्हेंबर | २२ | ६४७ | १०७२ | ३० |
| ९ | डिसेंबर | १९ | १२६८ | २०६६ | २० |
| १० | जानेवारी | १७ | ५६५ | ९३७ | १० |
| ११ | फेब्रुवारी | १३ | ३७६ | ६५० | २० |
| १२ | मार्च | १७ | ७१२ | ११२१ | १३ |









# बाल साप्ताह ( १४ नोव्हेंबर )

| अ.क्र. | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|
| १ | १४/११/२०२२ | चाईल्ड लाईन ऑफिस |
| २ | १५/११/२०२२ | १०० फुटी रोड शालीमार मंगलकार्यालय च्या मागे |
| ३ | १६/११/२०२२ | शांताबाई श्रावण अहिरे शाळा |
| ४ | १७/११/२०२२ | पंचायत समिती साक्री |
| ५ | १९/११/२०२२ | मोहाडी |
| ६ | २१/११/२०२२ | स्वाक्षरी मोहीम |



बाल सप्ताह निमित्त सहभागी विद्यार्थी व कर्मचारी



जळगाव । शुक्रवार
२९.४.२०२२

किंमत : ₹ ४ ■ वर्ष : ४४ अंक : १३४ ■ धुळे : पृष्ठे : १०+४=१४
आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र.३५८५३/१९७७
www.lokmat.com
epaper.lokmat.com

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत

चाईल्ड हेल्पलाईनवर मिळालेल्या माहितीवरुन केलेली कारवाई

# जिल्ह्यात चार महिन्यांत रोखले १३ बालविवाह

लोकमत न्यूज नेटवर्क

धुळे : केंद्रशासन पुरस्कृत महिला व बाल विकास मंत्रालय, नवी दिल्ली सहायित सप्तश्रृंगी बहुउद्देशीय महिला संस्थे अंतर्गत चालणाऱ्या चाईल्ड हेल्पलाईन १०९८ क्रमांकावर जिल्ह्यात अल्पवयीन मुलींचा बालविवाह होणार असल्याच्या माहितीनुसार . जिल्हा बाल संरक्षण कक्ष व चाईल्डलाईन यांच्या सतर्कतेने चार महिन्यात १३ बालविवाह रोखण्यात अधिकाऱ्यांना यश आले आहे.

बालविवाह होणार आहे याची पूर्व माहिती चाईल्ड लाईनच्या १०९८ हेल्पलाइन क्रमांकावर मिळताच सदर माहिती बालकल्याण समिती आणि जिल्हा बाल संरक्षण कक्षाला देण्यात आली. तसेच संबंधित पोलीस स्टेशन यांच्या साह्याने एक पथक संबंधित गावात दाखल होऊन समुपदेशन करून तसेच बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ विषयी माहिती देऊन होणारे बालविवाह थांबविण्यात यश आले. त्यानंतर संबंधित गावातील ग्रामपंचायत, शाळा आणि अंगणवाडी केंद्र येथून अल्पवयीन - बालिकेचा वयाचा पुरावे प्राप्त केलेत या पुराव्याच्या आधारावर बालिकांचे वय निश्चित करून बालविवाह थांबविण्यात आले.

संबंधित पोलिस विभागाच्या सहकार्याने बालसंरक्षण कक्ष व धुळे चाईल्डलाईन टीमने स्वतः उपस्थित राहून कार्यवाही पार पाडली. अल्पवयीन बालिकेचे व तिच्या पालकांचे समुपदेशन करून मुलाला, मुलीला तसेच त्यांच्या पालकांना धुळे बालकल्याण समिती समोर उपस्थित करण्यात आले. सदर चाईल्डलाईन प्राप्त प्रकरणात जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सचिन शिंदे, संस्था अध्यक्षा व बालकल्याण समिती सदस्या मीना भोसले यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

## अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर अलर्ट

- ३ मे २०२२ रोजी अक्षय तृतीया आहे व हा शुभ मुहूर्त समजला जातो. या दिवशी अधिकाधिक विवाह होतात. यामध्ये बालविवाहचे प्रमाणदेखील आहे. अशा वेळी नागरिकांनी दक्ष राहावे, गावात बालविवाह होत असतील तर तत्काळ चाइल्डलाइनच्या १०९८ हेल्पलाइन क्रमांकावर कॉल करून माहिती द्या. सदर माहिती ही पूर्णपणे गोपनीय असून यामध्ये कॉल करणाऱ्या व्यक्तीचे नाव गुपित ठेवलेले असते, असे आवाहन धुळे चाईल्डलाईन प्रकल्प समन्वयक अजय ताकटे यांनी केले आहे.

### साक्री तालुक्यात प्रथम

चार महिन्यात रोखण्यात सर्वात जास्त बालविवाह हे साक्री तालुक्यात रोखण्यात आले. साक्री तालुक्यात सहा, त्याखालोखाल धुळे शहर चार, धुळे ग्रामीण एक आणि शिरपूर आणि शिंदखेडा तालुक्यात एक - एक बालविवाह थांबविण्यात आला आहे.

जिल्ह्यात अक्षयतृतीयेच्या दिवशी मोठ्याप्रमाणावर लग्न समारंभ होतात. त्यामुळे त्यादिवशी जर कोणाला असा प्रकार होताना दिसला तर त्याने त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सकाळ
धुळे
शुक्रवार, १० मार्च २०२३
TODAY

हडसुणेतील प्रकार : बालसंरक्षण समितीचे यशस्वी प्रयत्न

# तीन बालविवाह रोखले



▸ सकाळ वृत्तसेवा

धुळे, ता. ९ : बालविवाहाबाबत निनावी फोन, शिवाय अन्य चर्चेतून माहिती मिळाल्यावर जिल्ह्यात तीन बालविवाह रोखण्यास बालसंरक्षण समितीला यश आले. विशेष म्हणजे हडसुणेत (ता. धुळे) दोन अल्पवयीन बहिणींचा दोन अल्पवयीन मुलांसोबत एकाच मांडवात गुरुवारी (ता. ९) बालविवाह होणार होता. तो रोखण्यात समितीसह यंत्रणेला यश आले. नागरिकांनी असे काही प्रकार निर्भिडपणे कळविल्यास बालविवाह रोखता येऊ शकतील, असे समितीने सांगितले.

हडसुणे येथे अल्पवयीन मुलीचा बालविवाह होणार असल्याची निनावी माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आणि जिल्हा बालसंरक्षण कक्षाला मिळाली. ही माहिती चाइल्ड लाइनच्या १०९८ या हेल्पलाइनवर प्राप्त झाली. त्यानुसार तत्काळ पावले उचलत उचित कार्यवाही केल्याने अल्पवयीन मुलीचा बालविवाह रोखण्यात जिल्हा बालसंरक्षण समितीस यश आले.

## पथक, पोलिस हडसुणेत

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी बुवनेश्वरी एस. आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सचिन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली परिवीक्षा अधिकारी राकेश नेरकर, जिल्हा बालसंरक्षण [illegible] सतीश चव्हाण यांनी समन्वयातून जिल्हा बालसंरक्षण कक्षातील संरक्षण अधिकारी तृप्ती पाटील (संस्थात्मक) व संरक्षण अधिकारी देवेंद्र मोहन (संस्थाबाह्य), चाइल्ड लाइनच्या प्रतिनिधी प्रतीक्षा शिरसाट यांचे पथक तयार केले. ते हडसुणे येथे कार्यवाहीसाठी दाखल झाले. तेथील पोलिसपाटील, ग्रामसेवक, सरपंचांशी संपर्क साधला. तालुका पोलिस ठाण्याचे निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांनी या प्रकरणी तत्काळ दखल घेत सुनील जावरे यांच्या सहकार्याने हडसुणे गाठले.

## मुलाचा विवाह रोखला

हडसुणेत आणखी एका अल्पवयीन मुलाचा साखरपुडा झाल्याची माहिती समितीला मिळाली. त्यानुसार संबंधित ठिकाणी बालविवाह रोखण्याबाबत संबंधित मुलाच्या कुटुंबाला कायद्याची माहिती देण्यात आली. त्यामुळे हा बालविवाह रोखण्यास यश आले. जिल्हा परिषद सदस्या पाटील, सरपंच भीमराव पगारे, ग्रामसेवक एस. आर. उदीकर यांच्या सहकार्याने तीन बालविवाह रोखण्यात यश आल्याचे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सचिन शिंदे यांनी सांगितले. याकामी सीईओ बुवनेश्वरी एस., श्री. शिंदे, पोलिस निरीक्षक शिंदे व पथकाने परिश्रम घेतले.

## हमीपत्रासह समुपदेशन

■ बालविवाह ठिकाणी जन्म पुराव्याची तपासणी केली असता संबंधित मुलगी १८ वर्षांखालील असल्याचे पथकाला खात्री पटली. संबंधितांच्या घरी वर व वधूपक्षाला एकत्रित बसवून बालविवाहाचे दुष्परिणाम आणि बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ नुसार होणाऱ्या कार्यवाहीची माहिती देण्यात आली. वडिलांकडून मुलीचे १८ वर्षे वय पूर्ण झाल्याशिवाय तिचा विवाह करणार नाही, असे हमीपत्र लिहून घेण्यात आले. तसेच संबंधित मुलीचे समुपदेशन करण्यात आले. हडसुणेत गुरुवारी दोन अल्पवयीन बहिणींचा दोन अल्पवयीन मुलांसोबत एकाच मांडवा[illegible]रा बालविवाह रोखण्यात यंत्रणेला यश मिळाले.

पुण्य नगरी

# जिल्ह्यात सहा महिन्यात रोखले २० बालविवाह



**धुळे** : केंद्रशासन पुरस्कृत महिला व बाल विकास मंत्रालय, नवी दिल्ली सहायित सप्तश्रृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेंतर्गत चालणाऱ्या चाईल्ड हेल्पलाईन १०९८ क्रमाकांवर आलेल्या तक्रारींनुसार जिल्हा बाल संरक्षण कक्ष व चाईल्डलाईन यांच्या सतर्कतेने गेल्या ६ महिन्यात २० बालकांचे बालविवाह रोखण्यात अधिकाऱ्यांना यश आले आहे.

जिल्हयात अल्पवयीन बालकांचा बालविवाह होणार असल्याची माहिती १०९८ वर तक्रारकर्त्यांकडून प्राप्त होत असते. त्यानुसार बालविवाह यंत्रणेमार्फत बालविवाह थांबविण्याची कार्यवाही केली जाते. बालविवाह होणार असल्याची माहिती चाईल्ड लाईनच्या १०९८ हेल्पलाइन क्रमाकांवर मिळताच सदर माहिती बालकल्याण समिति आणि जिल्हा बाल संरक्षण कक्षाला देण्यात येते. तसेच संबंधित पोलिस स्टेशनच्या सहाय्याने एक पथक संबंधित गावात दाखल होऊन समुपदेशन करून बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ विषयी माहिती दिली जाते. त्यांनतर संबधित गावातील ग्रामपंचायत, शाळा आणि अंगणवाडी केंद्र येथून अल्पवयीन बालिकेचे वयाचे पुरावे प्राप्त केले जातात. या पुराव्याच्या आधारे बालिकांचे वय निश्चित करून बालविवाह थांबविण्यात येतात. संबंधित पोलिस विभागाच्या सहकार्याने बालसंरक्षण कक्ष व धुळे चाईल्डलाईन टीम स्वतः उपस्थित राहून कार्यवाही पार पाडते. अल्पवयीन बालिकेचे व तिच्या पालकांचे समुपदेशन करून मुलाला, मुलीला तसेच त्याच्या पालकांना धुळे बालकल्याण समित समोर उपस्थित केल्यावर सदर चाईल्डलाईन प्राप्त प्रकरणात जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सचिन शिंदे, संस्था अध्यक्षा मीना भोसले तसेच बालकल्याण समिती अध्यक्षा व सदस्य याचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभत असते.

साक्री तालुक्यात प्रथम सहा महिन्यात सर्वात जास्त बालविवाह रोखण्यात आले. साक्री तालुक्यात ९ बालविवाह थांबवण्यात आले. जिल्हयात अक्षयतृतीयेच्या दिवशी मोठ्याप्रमाणावर लग्न समारंभ होतात. त्यामुळे त्यादिवशी जर कोणाला असा प्रकार होताना दिसला तर त्याने त्वरित चाईल्ड हेल्प लाईन १०९८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अक्षयतृतियेच्या मुहूर्तावर अलर्ट

२२ मे २०२३ रोजी अक्षय तृतीया असून विवाहासाठी हा शुभ मुहूर्त समजला जातो. या दिवशी अधिकाधिक विवाह होतात. यामध्ये बालविवाहाचे प्रमाणदेखील आहे. अशा वेळी नागरिकानी दक्ष राहावे, गावात बालविवाह होत असतील तर तत्काळ चाईल्ड लाईनच्या १०९८ या क्रमांकावर कॉल करून माहिती द्यावी. सदर माहिती ही पुर्णपणे गोपनीय असून यामध्ये कॉल करणाऱ्या व्यक्तीचे नाव गुपित ठेवलेले जाईल असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती भुवनेश्वरी एस ,जिल्हा महिला बालविकांस अधिकारी सचिन शिंदे , चाईल्ड लाईन संचालक संस्था अध्यक्षा श्रीमती मीना भोसले यांनी केले आहे.

## सप्तशृंगी युनिसेफ मार्फत बाल विवाह उच्चाटनाकरीता नवयुवक विद्यार्थी सबलीकरण आणि पालक जागरूकता कार्यक्रम

**दिनांक २० ऑगस्ट २०२२ ते १२ डिसेंबर २०२२ पर्यंत स्वयंसेविकांमार्फत १३१ शाळामध्ये विद्यार्थी सत्र व १३६ पालक सत्र घेण्यात आले असून त्यात एकूण २७४४३ विद्यार्थ्यांना व २२१९८ पालकांना बालविवाह प्रशिक्षण देण्यात आले.**



दैनिक दिव्य मराठी

दिव्य सिटी

धुळे. सोमवार, २७ जून २०२२ | ज्येष्ठ कृ.१४, शके १९४४

जिल्ह्यात प्रमाण ४० टक्के, सन 2030 पर्यंत प्रमाण शून्यावर, युनिसेफची मद

# बालविवाहात तिसऱ्या स्थानी; कायद्याचे ज्ञान देण्यासाठी १२५ शाळांमध्ये 'सक्षम'

दिव्य मराठी एक्सक्लुझिव्ह

अमोल पाटील | धुळे

बालविवाहावर प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने विविध कायदे केले आहेत. याविषयी प्रबोधनही होते. ही स्थिती असली तरी जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण वाढते आहे. सन २०१९-२० मधील राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार जिल्ह्यात ४०.५ टक्के बालविवाह झाले. हे प्रमाण ६ टक्के वाढले. बालविवाहात जिल्हा राज्यात तृतीय क्रमांकावर आहे. बालविवाहाचे प्रमाण सन २०३० पर्यंत शून्यावर आणण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहे. त्यासाठी महिला आणि बालकल्याण विभाग व युनिसेफच्या माध्यमातून वर्षभरापासून मिशन सक्षम अभियान राबवण्यात येते आहे.

बालविवाह थांबवण्यासाठी जागृती केली जाते आहे. ही स्थिती असली तरी सततचा दुष्काळ, निरक्षरता, गरिबी आदी कारणांमुळे जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण राज्याच्या इतर जिल्ह्याच्या तुलनेत सर्वाधिक आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार बालविवाहात जिल्हा राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. सन २०३० पर्यंत बालविवाहाची संख्या शून्यावर आणण्यासाठी महिला आणि बालकल्याण विभाग, युनिसेफच्या माध्यमातून राज्यातील १२ जिल्ह्यांत मिशन सक्षम हाती घेतले आहे. या अभियानांतर्गत लोकशिक्षण, कायद्याचे शिक्षण, प्रशिक्षणावर भर दिला आहे. मिशन सक्षमअंतर्गत १२५ शाळांमध्ये बालविवाह प्रतिबंधक कायद्यावर जनजागृतीसाठी पायलट प्रोजेक्ट राबवण्यात येतो आहे. या उपक्रमांतर्गत २५ हजार बालक आणि ५० हजार पालकांचे प्रबोधन होईल. त्यासाठी स्थानिक पातळीवर चाइल्डलाइन आणि सप्तशृंगी महिला बहुउद्देशीय संस्थेची मदत घेण्यात येते आहे.

### शहराच्या तुलनेत ग्रामीण भागात जास्त

बालविवाहाचे प्रमाण शहराच्या तुलनेत ग्रामीण भागात अधिक आहे. ग्रामीण भागात बालविवाह रोखण्यासाठी बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून ग्रामसेवक तर सहायक अधिकारी म्हणून अंगणवाडी सेविकांची नियुक्ती झाली आहे. युनिसेफकडून ग्रामसेवक, महिला आणि बालकल्याण विभागाच्या प्रकल्प अधिकारी, आशा गटप्रवर्तकांना प्रशिक्षण दिले आहे. प्रकल्प अधिकारी ग्रामीण पातळीवर अंगणवाडी सेविकांना तर गटप्रवर्तक आशांना प्रशिक्षण देतील.

### 2015 मध्ये प्रमाण होते 34 टक्के

राष्ट्रीय कुटुंब व आरोग्य सर्वेक्षण दर चार वर्षांनंतर होते. त्यात महिला आणि बालकांचे आरोग्य, शिक्षण, आजारांचे प्रमाण, बाल व माता मृत्यू, विवाहाचे वय, कुमारी मातांचे प्रमाण आदींची माहिती संकलित होते. सन २०१५-१६ मध्ये जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण ३४ टक्के होते. त्यात वाढ होऊन हे प्रमाण ४०.५ टक्के झाले आहे. सर्वेक्षणानुसार १८ वर्षाआतील मातांचे प्रमाण १५ टक्के आहे.

### टास्क फोर्सची स्थापना

बालविवाह रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स गठीत झाली आहे. या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असून, सचिव महिला आणि बालविकास अधिकारी आहे. तसेच शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, आरोग्याधिकारी, पोलिस अधीक्षक सदस्य आहे. टास्क फोर्सच्या माध्यमातून जिल्ह्यातील मंगल कार्यालय, मंडप व्यावसायिक, केटरिंग चालक, फोटोग्राफर, भटजी यांची स्वतंत्र कार्यशाळा घेण्यात येणार आहे. हा कार्यक्रम सक्षम युवाशक्तीअंतर्गत राबवण्यात येतो आहे. बालविवाह रोखण्यासाठी विवाह नोंदणी सक्तीची झाली आहे.

**राज्यातील पहिले दहा जिल्हे कोणते**

कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार परभणीत ४८ टक्के, बीडमध्ये ४३.७, धुळ्यात ४०.५ टक्के, सोलापूरला ४०.३, हिंगोलीत ३७.१, उस्मानाबादला ३६.६, जालन्यात ३५, नांदेडला ३२.२, लातूरला ३१, नाशिकला २९.६, जळगावला २८, वाशिममध्ये २७.७ टक्के बालविवाहाचे प्रमाण आहे.

### आता विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये प्रबोधनासाठी केले जाणार प्रयत्न

सन २०३० पर्यंत बालविवाहाचे प्रमाण शून्यावर आणण्याचे ध्येय आहे. त्यासाठी सर्व शासकीय विभागांची मदत घेतली जाते आहे. प्रत्येक विभागाचा कृती आराखडा होणार आहे. ज्या जिल्ह्यात मुलींचे शिक्षण दहावीपर्यंत झाले आहे. त्या जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांमध्ये प्रबोधनासाठी प्रयत्न होत आहे.
**नंदू जाधव,** धुळे व जळगाव जिल्हा समन्वयक, युनिसेफ

### कोरोनाकाळात वाढ शक्य

बालविवाह रोखण्यासाठी प्रयत्न होत असले तरी प्रमाण जास्त आहे. कोरोना काळात विवाह वाढल्याची शक्यता आहे. बालविवाह रोखण्यासाठी शाळा शाळांमध्ये बालविवाह कायद्यावर प्रबोधन करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रशिक्षण दिले जाते आहे.
**-मीना भोसले,** अध्यक्षा: सप्तशृंगी महिला बहुउद्देशीय संस्था (चाइल्ड लाइन)

दिव्य मराठी

# दिव्य सिटी

स्वतंत्र वृत्तपत्र

धुळे. बुधवार, २१ डिसेंबर २०२२ | मार्गशीर्ष कृ. १३, शके १९४४

**दिव्य मराठी विशेष** • बालवयात विवाह करणार नाही अशी शपथ घेणाऱ्यांच्या तक्रारीनंतर विवाह थांबले

## बालविवाहविरोधी जनजागृतीत धुळे आघाडीवर

प्रतिनिधी | धुळे

जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण जास्त असल्याने युनिसेफ, महिला बालविकास विभाग आणि सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेतर्फे शालेय विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी विशेष अभियान राबवले जाते आहे. या अभियानांतर्गत अनेक शाळेतील विद्यार्थ्यांनी आम्ही कमी वयात लग्न करणार नाही असा संकल्प केला. जनजागृती सुरू झाल्यावर चाइल्ड लाइनच्या हेल्पलाइनवर १३ जणांनी बालविवाहाची तक्रार केली. त्यामुळे बालविवाह रोखण्यात यश आले. जनजागृतीच्या चळवळीत धुळे जिल्हा राज्यात आघाडीवर आहे.



बालविवाहाच्या विरोधात शाळांमध्ये जनजागृती करताना पदाधिकारी.

### शिक्षण घ्यायचे आहे, विवाह करायचा नाही

प्रशिक्षण व समुपदेशन झालेल्या विद्यार्थ्यांनी स्वतः १०९८ या हेल्पलाइनवर फोन करून बालविवाह रोखण्याचे धाडस दाखवले. जनजागृती मोहिमेसाठी समन्वयक प्रतीक्षा मगर, ललिता अहिरे, सुनीता चौरे, छाया भदाणे, तेजश्री जगदाळे, संगीता पाटील, अलका थोरात, ज्योती परदेशी, शीतल भोकरे, मीना भोसले, हिरालाल भोसले, नंदू जाधव, युनिसेफचे जिल्हा प्रकल्प समन्वयक नंदू जाधव, विशाल साळुंखे आदींनी प्रयत्न केले.

### बालवयात विवाह न करण्याचे पटले महत्त्व

विद्यार्थ्यांना बालवयात विवाह न करण्यासह शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. कमी वयात विवाह केल्याने होणारे नुकसान लक्षात आल्याने कमी वयात विवाह करणार नाही अशी प्रतिज्ञा केलेल्यांपैकी १३ जणांनी १०९८ या चाइल्ड लाइन हेल्पलाइनवर विवाहाची तक्रार केली. त्यामुळे हे बालविवाह रोखण्यात यश आले.

जिल्ह्यातील ज्या गावांत बालविवाहाचे प्रमाण जास्त आढळले त्या गावात सप्तशृंगी बहुदेशीय महिला संस्थेमार्फत बालविवाह विषयक जनजागृती मोहीम झाली. या मोहिमेसाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी बुवनेश्वरी एस, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सचिन शिंदे, जिल्हा बाल संरक्षण कक्ष आढावा समिती, युनिसेफच्या पूनम कश्यप, प्रकल्प अधिकारी तृप्ती धोडमिसे, नंदू जाधव व सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा मीना भोसले यांनी पुढाकार घेतला. त्यानुसार १२५ शाळेतील विद्यार्थ्यांना बालविवाहामुळे होणाऱ्या नुकसानीची माहिती दिली. अभियानांतर्गत २४ हजार ८६३ पालक व २५ हजार १२२ विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यात आले.

---

लोकमत

# हॅलो धुळे

गुरुवार २२.१२.२०२२

epaper.lokmat.com

बालविवाहाविरोधात वज्रमूठ, पालकांचे प्रबोधन

## १२५ शाळेतील विद्यार्थिनींनी घेतली बालविवाहविरोधी शपथ

लोकमत न्यूज नेटवर्क

धुळे : बालविवाह वेळीच रोखले जावेत, मुलींनी स्वतः पुढे येत बालविवाहाला विरोध करावा यासाठी महिला बालविकास विभाग व सप्तश्रृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती अभियान राबवण्यात आले. जिल्ह्यातील १२५ शाळांमध्ये विद्यार्थिनींना बालविवाहविरोधी शपथ देण्यात आली.

राज्यातील बालविवाहांचे प्रमाण जास्त असलेल्या १७ जिल्ह्यांमध्ये जनजागृती अभियान राबविण्याच्या सूचना राज्य शासनाने केल्या होत्या. बालविवाहांची संख्या जास्त असलेल्या जिल्ह्यातील गावांमध्ये विद्यार्थी व पालकसत्र घेऊन जनजागृती करण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींना बालविवाहाचे तोटे, बालविवाहानंतर आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती देण्यात आली. विविध खेळ, प्रश्नावलीच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात आले; तसेच समुपदेशनाच्या माध्यमातून विद्यार्थिनींच्या शंकांचे समाधान करण्यात आले. उपक्रमासाठी सहायक जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी भुवनेश्वरी एस., जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सचिन शिंदे, युनिसेफ संस्थेच्या पूनम कश्यप, नंदू जाधव व सप्तश्रृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा मीना भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. जनजागृती कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रतीक्षा मगर, ललिता अहिरे, छाया भदाणे, सुनीता चौरे, तेजश्री जगदाळे, संगीता पाटील, अलका थोरात, ज्योती परदेशी, शीतल भोकरे, व्यवस्थापक हिरालाल भोसले, नंदू जाधव, विशाल साळुंखे यांनी परिश्रम घेतले.



महिला बालविकास विभाग व सप्तश्रृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती अभियानात राबविण्यात आले. याप्रसंगी उपस्थित मीना भोसले, प्रतीक्षा मगर, छाया भदाणे, सुनीता चौरे, हिरालाल भोसले, नंदू जाधव आदी.

### चाइल्ड लाइनकडे १३ तक्रारी

पालक व विद्यार्थी सत्र घेतलेल्या गावांमधील बालविवाहाच्या १३ तक्रारी १०९८ हेल्पलाईनद्वारे चाइल्डलाइनकडे प्राप्त झाल्या असल्याची माहिती मीना भोसले यांनी दिली आहे. विद्यार्थिनींना शिक्षणाचे महत्त्व व बालविवाहामुळे होणाऱ्या नुकसानीची स्पष्टता आली असून, बालविवाह न करण्याचा निर्धार त्यांनी केला असल्याचे त्यांनी सांगितले.

## धुळे महापालिकेच्या क्षयरोग दुरीकरण केंद्रात उपचार घेणाऱ्या २० क्षयरुग्णांना सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्थेतर्फे मोफत पोषण आहार वाटप करण्यात आले.




क्षयरुग्णांना मोफत पोषण आहार वाटप  कार्यक्रमाला धुळे महापालिकेच्या उपायुक्त डॉ.संगीता नांदुरकर, सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ. मीना भोसले, अमोल पाटील, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.एम.आर.शेख, क्षयरोग अधिकारी डॉ.जे.सी पाटील उपस्थित होते.




क्षयरुग्णांना मोफत पोषण आहार वाटप  करतांना धुळे महापालिकेच्या उपायुक्त डॉ.संगीता नांदुरकर, सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ. मीना भोसले, अमोल पाटील, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.एम.आर.शेख आणि क्षयरोग अधिकारी डॉ.जे.सी पाटील.

www.epunyanagari.com Toll Free 18002081019

पुण्य नगरी

जळगाव-धुळे ✱ गुरुवार, २५ ऑगस्ट २०२२ ।वर्ष :२१ ।अंक : १० ।पाने : १०+४=१४ ।किंमत : ५.००

# क्षयरुग्णांना पोषण आहार वाटप

**धुळे** : महापालिकेच्या क्षयरोग दुरीकरण केंद्रात उपचार घेणाऱ्या २० क्षयरुग्णांना सप्तश्रृंगी बहुद्देशीय महिला संस्थेतर्फे मोफत पोषण आहार वाटप करण्यात आला. संदीप पाटील व अमोल पाटील यांच्या माध्यमातुन ६ किलो गहु, ६ किलो तांदुळ, १ किलो शेंगतेल, १ किलो हिरवेमुग, १ किलो शेंगदाणे, १ किलो बेसनपीठ, १ किलो गुळ अशा साहित्याचा पुरवठा करण्यात आला. त्यानंतर मनपा सभागृहात पोषण आहाराचे वाटप झाले. यावेळी



उपायुक्त डॉ.संगिता नांदुरकर, श्री. सप्तश्रृंगी बहुद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा मीना भोसले, अमोल पाटील, वैद्यकीय आरोग्याधिकारी डॉ.एम. आर. शेख, शहर क्षयरोग अधिकारी डॉ.जे. सी. पाटील, शशिकांत कुवर, प्रिती कुलकर्णी, सुहास वसावे, चेतन महाजन, अनिल बागुल, प्रकाश देवरे, रवींद्र भामरे, शाहु महाजन, प्रसाद अहिरराव, निलेश जगदाळे आदी उपस्थित होते. यावेळी मीना भोसले यांनी १ वर्ष कालावधीकरीता शहरातील २० क्षयरुग्णांना पोषण आहार पुरवठा करण्याबाबत पालकत्व स्विकारले.

**Vitamin Angel आणि सप्तश्रुंगी बहुउद्देशिय महिला संस्था धुळे संयुक्त विद्यमाने धुळे जिल्ह्यातील ० ते १८ वयोगटातील मुलांना दंत नाशक गोळयांचे वाटप करण्यात आले व आरोग्याच्या सुविधा देण्यात आल्या.**


CERTIFICATE OF COMPLETION

This is to certify that

MINA HIRALAL BHOSALE

from

Saptashrungi Bahuudeshiya Mahila Sanstha, Dhule, Maharashtra

has successfully completed the

"Vitamin Angels Basic Certificate Course"

DR. SHILPA BHATTE

SENIOR PROGRAM ADVISOR (INDIA)

vitamin angels

VA-IN-19/0344






श्रीमती.  मीना हिरालाल भोसले सप्तश्रुंगी बहुउद्देशिय महिला संस्था  धुळे यांना महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे महिला व बालविकास राज्यमंत्री यशोमती ठाकूर यांच्या हस्ते देहविक्री व्यवसायात गुंतलेल्या महिलांचे पुनर्वसन करून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.






सन्मान पत्र

श्रीमती **मीना हिरालाल भोसले**, जिल्हा धुळे,

यांनी स्वतःच्या सामाजिक संस्थे मार्फत वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांचे पुनर्वसन करुन सामाजिक क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीबद्दल मनःपूर्वक अभिनंदन !!!

आपला गौरव करीत असताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

| | |
|---|---|
| श्रीमती श्रद्धा जोशी | श्रीमती ज्योती ठाकरे |
| व्यवस्थापकीय संचालक, माविम | अध्यक्ष, माविम (राज्यमंत्री दर्जा) |



पुण्यनगरी

मीना भोसले यांचा 'माविम' तर्फे गौरव

धुळे सिटी 23-04-2022

सामाजिक कार्यामुळे महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे भोसलेंचा गौरव

मीना भोसले यांचा महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्यातर्फे गौरव

दैनिक तुफान क्रांती

मीना भोसले यांचा महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) यांच्यातर्फे गौरव

दैनिक मराठा संदेश

जबलपूर, शुक्रवार 22 अप्रैल 2022

मीना भोसले पुरस्कृत

**महाराष्ट्र शासन महिला व बालकल्याण विभागामार्फत देण्यात येणारा अहिल्याबाई होळकर पुरस्काराने सौ.मीना भोसले यांचा सन्मान.**




महाराष्ट्र शासन महिला व बालकल्याण विभागामार्फत देण्यात येणारा अहिल्याबाई होळकर पुरस्कार सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले यांना मा.जिल्हाधिकारी श्री. जलज शर्मा महिला व बालकल्याण अधिकारी मा.सचिन शिंदे, जि.प.महिला व बालकल्याण सभापती संजीवनी ताई सिसोदे यांच्या हस्ते देण्यात आला.



# अहिल्याबाई होळकर पुरस्काराने मीना भोसले यांचा सन्मान

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते वितरण, अनेकांची उपस्थिती

लोकमत न्यूज नेटवर्क

धुळे : महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत देण्यात येणारा अहिल्याबाई होळकर पुरस्कार मीना भोसले आणि हिरालाल भोसले यांना जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या हस्ते देण्यात आला.

यावेळी महिला व बालकल्याण अधिकारी सचिन शिंदे, जि. प. महिला व बालकल्याण सभापती संजीवनी सिसोदे उपस्थित होते. सदरील पुरस्कार. हा महिला व बालकल्याण विभागाचा सर्वोच्च पुरस्कार असुन ज्या महिला १० वर्ष पेक्षा जास्त वर्ष महिला आणि बालकांसाठी काम करतात. त्या महिलांना हा पुरस्कार देण्यात येतो.

या आधी मीना भोसले यांना महाराष्ट्र शासनाने आठ वेगवेगळ्या विभागाचे पुरस्कार देवून राज्य पातळीवर गौरविले आहे. व यशवंतराव मुक्त विद्यापीठाच्या रूक्मिणी पुरस्कार राज्य पातळीवर देवून त्यांचा सन्मान झाला आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे कौतूक होत आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना मीना भोसले, हिरालाल भोसले.

## सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेमार्फत HRG व HRG च्या मुलांसाठी किराणा वाटप

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई (MSACS) सहाय्यित सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्था धुळे मार्फत अति जोखीम गट व अति जोखीम गटातील लोकांच्या मुलांना सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ.मिना भोसले यांच्या हस्ते एकूण **३३ कुटुंबांना व मुलांना** किराणा वाटप करण्यात आले.





**संस्थेच्या अध्यक्षा सौ.मिना भोसले, संस्थेचे कर्मचारी व अति जोखीम गटातील कुटुंबे व त्यांची मुले किराणा वाटप करताना.**

**बाल विवाह प्रशिक्षण कार्यक्रम:-**

बालविवाह विषयी जनजागृती हि काळाची गरज बनत चालली आहे हि बाब लक्षात घेता, UNICEF व SBC3 यांच्या माध्यमातून सप्तशृंगी बहुउद्देशीय महिला संस्थेच्या महिला कर्मचार्यांना दिनांक २७ जुन २०२२ ते २८ जुन २०२२ रोजी नाशिक येथे दोन दिवसाचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे कारण शिक्षण आणि बालविवाहचा घनिष्ट संबंध आहे. मुलींना शाळेच्या प्रवाहात ठेवणे गरजेचे आहे म्हणून धुळे जिल्ह्यातील **१२५** शाळांमध्ये **२६७** सत्र व जवळजवळ **४९६४१** विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्यापर्यंत पोहचून कार्यक्रम घेण्यात आले.

एकूण सहभागी विद्यार्थी आणि पालक पुढील प्रमाणे

| | एकूण पालकांचे सत्र | एकूण सत्र संख्या | एकूण सहभागी | | | एकूण विद्यार्थ्यांचे सत्र | एकूण सत्र संख्या | एकूण सहभागी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्त्री | पुरुष | एकूण | | | मुली | मुले | एकूण |
| 1 ला टप्पा | 7 | 15 | 474 | 1180 | 1654 | 25 | 65 | 2195 | 2401 | 4596 |
| 2 रा टप्पा | 42 | 157 | 4682 | 4293 | 8975 | 33 | 137 | 4179 | 4081 | 8260 |
| 3 रा टप्पा | 87 | 211 | 5582 | 5987 | 11569 | 73 | 228 | 7343 | 7244 | 14587 |
| **एकूण** | **136** | **393** | **10738** | **11460** | **22198** | **131** | **430** | **13717** | **13726** | **27443** |




आदर्श माध्यमिक विद्यालय मोरणे प्र. नेर दिनांक 17/08/2022




**नूतन माध्य. व उच्चा माध्यमिक विद्यालय अईचले ता.जि.धुळे दिनांक 24/11/2022**

**सप्तशृंगी बहूउद्देशिय महिला संस्थेमार्फत धुळे जिल्ह्यातील मुलींना स्वयंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरिक विकासासाठी ज्युडो कराटेयोगा , जीवन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

| अ.क्र. | शाळेचे नाव | प्रशिक्षणार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | सरस्वती  कन्या विद्यालय फागणे ता. धुळे | १२५ |
| २ | इंदिरा गांधी कन्या विद्यालय, पिंपळनेर ता. साक्री | १२५ |
| ३ | रंधे कन्या विद्यालय शिरपूर ता. शिरपूर | १२५ |
| ४ | कृषी माध्य. विद्यालय ,होळ ता. शिंदखेडा | १२५ |
| | **एकूण** | **५००** |






**खान्देश अनमोल रत्न व नारीशक्ती पुरस्कार:-**

सप्तशृंगी बहुद्देशीय महिला संस्थेच्या १७ वा वर्धापन दिनानिमित्त उत्कृष्ट कर्मचार्यास खान्देश अनमोल रत्न व नारीशक्ती सन्मान पुरस्कार वितरीत करण्यात आले.

| अ.क्र. | खान्देश अनमोल पुरस्कार मानकरी | कार्य |
|---|---|---|
| १ | मा.श्री. राजेंद्र पाचपुते | सामाजिक कार्य |
| २ | मा.श्री. दीपक अहिरे | सामाजिक कार्य |
| ३ | मा.श्री. विलास कोठावदे | सामाजिक कार्य |
| ४ | श्री. विशाल साळुंखे | उत्कृष्ट कर्मचारी |
| ५ | श्री. झेलर पावरा | उत्कृष्ट कर्मचारी |
| ६ | श्री. लतीफ शेख | उत्कृष्ट कर्मचारी |
| ७ | श्री. बजरंग दुबे | उत्कृष्ट कर्मचारी |
| ८ | श्री. लोटन करनकाळ | उत्कृष्ट कर्मचारी |






- **नारीशक्ती पुरस्कार:-**

| अ.क्र. | नारीशक्ती पुरस्कार मानकरी | कार्य |
|---|---|---|
| १ | मा.सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी | सामाजिक कार्य |
| २ | मा.श्रीमती तृप्ती धोडमिसे | सामाजिक कार्य |
| ३ | मा.श्रीमती सारीकाताई रंधे | सामाजिक कार्य |
| ४ | मा.श्रीमती आशाताई रंधे | सामाजिक कार्य |
| ५ | मा.ॲड.रसिका राजेंद्र निकम | सामाजिक कार्य |
| ६ | मा.ॲड.प्रभावती मुकुंद माळी | सामाजिक कार्य |
| ७ | मा.ॲड.शीतल जावरे | सामाजिक कार्य |
| ८ | मा.श्रीमती विद्या भाटीया | कलाक्षेत्र |
| ९ | मा.श्रीमती मनीषा राजेंद्र खैरनार | सामाजिक कार्य |
| १० | मा.श्रीमती किरण राकेश कुलेवार | सामाजिक कार्य |
| ११ | मा.ॲड.कविता शशिकांत पवार | सामाजिक कार्य |
| १२ | मा.सौ.अश्विनी भूषण जाधव | सामाजिक कार्य |
| १३ | मा.सौ.संजीवनी संजय शिसोदे | सामाजिक कार्य |
| १४ | मा.श्रीमती मोनिका अशोक शिंपी | सामाजिक कार्य |
| १५ | मा.श्रीमती प्रभाताई परदेशी | सामाजिक कार्य |
| १६ | मा.श्रीमती सुनंदाताई कोचुरे | कलाक्षेत्र |
| १७ | मा.श्रीमती वंदना थोरात | सामाजिक कार्य |
| १८ | मा.श्रीमती आरती पवार | सामाजिक कार्य |
| १९ | श्रीमती जयश्री ठाकूर | उत्कृष्ट कर्मचारी |
| २० | कु.प्रतीक्षा मगर | उत्कृष्ट कर्मचारी |
| २१ | कु.सिमरन शेख | उत्कृष्ट कर्मचारी |
| २२ | सौ.मनीषा वाघ | उत्कृष्ट कर्मचारी |



## •धान्य व कपडा बँक:-

सप्तशृंगी बहुउद्देशिय महिला संस्था मार्फत सन २००६ पासून आज पावेतो जे गरीब व गरजू लोकांसाठी धान्य बँक व कपडा बँक उपक्रम राबविण्यात येतो. सदर उपक्रमामध्ये गरजूंसाठी धान्य व समाजातील लोकांकडून कपडे घेतले जातात. कपडे गोळा करून कपड्यांना उत्तम प्रकारे धुवून तसेच त्यांना इस्तरी करून गरीब व गरजू लोकांपर्यंत पोहचवले जातात. तसेच नागरिकांकडून धान्य जमा करून गरिबांसाठी मोफत अन्नधान्य पुरवठा करण्यात येतो. त्यामध्ये एकूण ४३३ लाभार्थी कुटुंबांना मोफत जीवनावश्यक वस्तूचा पुरवठा करण्यात आला.

| कपडा बँक लाभार्थी<br>सन-२००६ ते सन-२०२२ | | |
|---|---|---|
| अ.क्र. | वर्ष | कपड्यांचे वाटप |
| १ | २००६ | १५१ |
| २ | २००७ | ११५ |
| 3 | २००८ | ९५ |
| ४ | २००९ | ११९ |
| ५ | २०१० | १५० |
| ६ | २०११ | २१४ |
| ७ | २०१२ | २४७ |
| ८ | २०१३ | २५७ |
| ९ | २०१४ | २६८ |
| १० | २०१५ | २८८ |
| ११ | २०१६ | २७६ |
| १२ | २०१७ | २९८ |
| १३ | २०१८ | २६१ |
| १४ | २०१९ | ३५० |
| १५ | २०२० | २४६ |
| १६ | २०२१ | २९८ |
| १७ | २०२२ | २९१ |
| | एकूण | ३९२४ |



- **स्वयंरोजगार विषयक कार्य:-**

महिलांना उत्तम प्रकारे रोजगार मिळावा तसेच त्यांना स्वताचा पायावर उभे राहता यावे यासाठी रोटरी क्लब ऑफ धुळे क्रॉसरोड, धुळे फेस्टिवल यांच्या मार्फत दुग्ध प्रकिया, लोणचे, मसाले-पापड निर्मिती, कृषीपूरक स्वयं रोजगार महिलांसाठी स्वयं रोजगार यांच्यासाठी विक्रीसाठी बाजारपेठ उपलब्ध करून दिले जात



**शिवणकाम प्रशिक्षण, फॅशन डिझाईनिंग प्रशिक्षण, ब्युटी पार्लर प्रशिक्षण असे प्रशिक्षण कार्यक्रम सप्तशृंगी बहूउदेशिय महिला संस्था, महिला व बालविकास विभाग जिल्हा परिषद धुळे योजनेमार्फत सौ.मीना भोसले यांनी केलेले आहे.**



- **युवकांसाठी केलेले कार्य:-**

जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, धुळे यांच्यामार्फत युवक कल्याण कार्यक्रमाअंतर्गत ग्रामीण भागातील युवकांसाठी कृषी विषयक प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला.

त्याचप्रमाणे नेहरू युवा केंद्र, धुळे यांच्यातर्फे महाराष्ट्रातील लोकपरंपरा भारतातील लोकांना समजावी म्हणून 12 लोकांचे कला पथक हरिव्दार नेवून सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व संस्थेने केले.

क्रिडा विभागामार्फत संस्था स्वत :सहभागी होवुन विभागीय व जिल्हा आयोजन युवा महोत्सवाचे आयोजन करुन धुळे जिल्ह्यातील युवकांना त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव दिला.

- **पल्स पोलिओ:-**




**संपूर्ण देशात पल्स पोलिओ मोहिम राबविले जाते यात बज्यापौकी यश येते असतांनाच अधुन मधून पोलिओ रुग्ण आढळत असतात .विशेष करून मालेगाव येथे पोलिओचे रुग्ण आढळून येत आहेत ही गंभीर बाब ओळखून संस्था स्वत :प्रत्येक पल्स पोलिओ मोहिमेत सहभागी होऊन बाळांना डोस पाजण्याचे कार्य करीत आहे.**

- **महिला व बाल आरोग्यासाठी केलेले कार्य :-**

संस्थेने धुळे, जळगाव, नंदुरबार, नाशिक, पुणे येथे विविध आरोग्य विषयक शिबीरांचे आयोजन करुन ग्रामिण भागातील महिला व मुलांना आरोग्य यंत्रणे मार्फत विविध योजनांचा लाभ मिळवून दिला . तसेच सकस आहाराचे महत्व, कमी वयात होणारे विवाह, त्याचे दुष्परिणाम, कुपोषण, तंबाखु, मिश्रीचे दुष्परिणाम आदिंवर मार्गदर्शन शिबीरांचे आयोजन संस्थेमार्फत करण्यात आले.

## माझी वसुंधरा अभियानात सहभाग:-

माझी वसुंधरा अभियान हा महाराष्ट्रातील स्थानिक संस्थांमधील पर्यावरणाच्या संवर्धनासाठी निसर्गाच्या पंचतत्वांवर पृथ्वी, जल, अग्नि, वायु आणि आकाश(पंचमहाभूतांवर) आधारित माझी वसुंधरा या उपक्रमांतर्गत राबवण्यात येणारा पहिला कृतीशिल उपक्रम आहे. हे अभियान पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग यांच्या हस्ते सुरू करण्यात आले. तसेच धुळे महानगरपालिका अंतर्गत झालेल्या अभियानात संस्थेने सहभाग घेतला.

## कायदेविषयक प्रशिक्षण :-

जिल्हा विधिसेवा प्राधिकरण धुळे याठिकाणी सप्तशृंगी बहुउद्देशिय महिला संस्थेच्या कर्मचार्यांसाठी कायदेविषयक प्रशिक्षण राबविण्यात आले. त्यामध्ये लोकांसाठी असणारे विविध कायदे व त्यांचा उपयोग कसा घ्यावा यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले. जसे- हिंदु विवाह कायदा, वारसा कायदा, मालमत्ता विषयक कायदा अशा विविध कायद्यांविषयी प्रशिक्षणामध्ये मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामीण भागात असणारे विविध समस्या असतात तसेच अशिक्षितपणामुळे अनेकदा लोकांची फसवणूक होते तर अशा लोकांसाठी मोफत कायदेविषयक सेवा उपलब्ध व्हाव्या या हेतूने त्यांना जिल्हा विधिसेवाच्या सेवा अशा गरिब लोकांन्ना प्राप्त व्हावा या हेतूने प्रशिक्षण राबविले प्रशिक्षणामध्ये जिल्हा विधिसेवा प्राधिकरणाचे सचिव मा.श्री संदीप स्वामी सर यांचे मार्गदर्शन लाभले.

## आरोग्यविषयक तपासणी :-

### अवयव दान:-

आपण दिलेला अवयव एका व्यक्तीचे नाही तर अनेक व्यक्तींचे जीवन बदलू शकतो. त्यांच्या जीवनात आनंद आणू शकतो. १३ ऑगस्ट रोजीच्या जागतिक अवयवदान दिनानिमिताने सर्व जण मिळून सर्व लोकांमध्ये अवयवदानाबाबत जनजागृती कशी करता येईल, यासाठी प्रयत्न करणे आणि अनेकांना नवीन जीवन मिळवून देऊया. अवयवदान हे जिवंत असताना आणि मृत्यूनंतर अशा दोन्ही वेळी करता येते. एक व्यक्ती मृत्यूनंतर ८ जणांचे जीवन आनंदी बनवू शकतो. त्यासाठी आपण लोकांना अवयवदानासाठी प्रोत्साहित केले पाहिजे.

आयुर्वेदामधील सुश्रुत संहितेमध्ये अवयवदानाबाबत संदर्भ आले आहेत. याव्यतिरिक्त १९५४ मधे जगातील पहिले जिवंत अवयवदान आणि प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली. भारतामध्ये १९९८ मध्ये पहिली अवयव प्रत्यारोपण **(Organ Transplantation)** शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर आतापर्यंत अनेक रुग्णांना अवयवदानाचा लाभ झाला आहे. म्हणून अवयव दान करणे व इतरांना मदतीचा हात देणे याविषयी कार्यक्रम संपन्न.

### डोळे तपासणी :-

ग्रामीण भागातील अनेक लोकांना डोळ्यांचे विकार असतात. तसेच काही गरीब रुग्णांना दवाखान्यात जाण्यास देखील पैसे नसतात तर अशा लोकांसाठी ग्रामीण भागामध्ये मोफत डोळ्याची तपासणी करून त्यांचे डोळ्याचे मोफत शस्त्रक्रिया करून देणे असे कामे केली जातात.

### कुष्टरोग तपासणी :-

कुष्ठरोग ही एक अनादि काळापासून चालत आलेली मानवी समस्या असून या रोगाचे रोगजंतू मानवी मज्जातंतूमध्ये वाढत असल्याने रुग्णांस येणारी विद्रुपता व व्यंगत्वामुळे कुष्ठरोग एक लांच्छन

असल्याचा समाजातील कित्येकांचा समज होता व अजूनही आहे. भागामध्ये कॅम्पच्या माध्यमातून कुष्टरोग तपासणी कार्यक्रम राबविला जातो व लोकांचे असणारे गैरसमज समुपदेशनाच्या माध्यमातून दूर केले जातात.

**मधुमेह व हृदय विकार संबंधी तपासणी कार्यक्रम:-**

ग्रामीण भागातील लोकांना मधुमेह व हृदय विकार यासंबंधी माहिती प्राप्त व्हावी तसेच या आजाराविषयी देखरेख आणि काळजी कशी घेणे यासाठी गावांमध्ये कॅम्पच्या माध्यमातून डॉक्टरकडून लोकांची तपासानी करणे. तसेच ज्या व्यक्तीला काही त्रास असेल तर अशा व्यक्तीला मोफत उपचारासाठी मोठ्या दवाखान्यात संस्थेकडून रुग्णांना रेफर केले जातात.

## शासन आपल्या दारी कार्यक्रम

राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री.एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री मा.श्री देवेन्द्र फडणवीस यांनी शासण आपल्या दारी हे अभियान सुरु केले. अभियानाचे मुख्य उद्दिष्ट हे ग्रामीण भागातील गरीब व गरजू लोकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा. तसेच सदर अभियानचा शुभारंभ १४ मे २०२३ रोजी सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यापासून सुरुवात करण्यात आली.आतापर्यंत जवळजवळ २२ हजाराहून अधिक लोकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यात आला. त्यानुसार धुळे येथे झालेल्या शासन आपल्या दारी कार्यक्रमामध्ये संस्थेच्या अध्यक्षा सौ.मीना भोसले व संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

